श्री. पी.के.मुटकुळे, न्यायदंडाधीकारी, प्रथम वर्ग, कळवण, जि.नाशिक.

निशाणी क्रमांक ०

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | ०१/०६/२०२३ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादचा दिनांक | ०१/०६/२०२३ |
| ३ | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडिलांचे नांव, त्याचे वय व निवासस्थान इ. | पोलीस निरिक्षक, कळवण पोलीस ठाणे, ता.कळवण, जि.नाशिक. |
| ४ | आरोपीचे नांव, आरोपीच्या आई व वडिलांचे नावगांव व त्याचे निवासस्थान इ. | निलेश दत्तात्रय कोठावदे वय – ३२ वर्षे, रा. गणेशनगर, ता.कळवण, जि.नाशिक. |

५ (अ) ज्याबद्यल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील –

दिनांक ०१/०६/२०२३ रोजी, कसाळी १०.०० वाजताच्या सुमारास, कळवण देवळा मुख्य रस्त्यासमोरील हॉटेल प्रितमसमोर असलेल्या व नाव नसलेल्या पानटपरीवर, ता.कळवण, जि. नाशिक येथे तुम्ही महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला विमल पान मसाला, तंबाखु याचा साठा करतांना मिळुन आलात, व त्यायोगे भारतीय दंड विधान कायदा कलम २७२ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला.

०२. वरील नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी उपरोक्त नमुद मुद्येमाल महाराष्ट्र राज्यात बाळगण्यास, विक्री करण्यांस व खाण्यास शासनाने प्रतिबंध घातला आहे, याचे तुम्हाला ज्ञान व माहिती असतांनाही तुम्ही वर नमुद मुद्येमाल बाळगतांना मिळुन आलात, व त्यायोगे भारतीय दंड विधान कायदा कलम २७३ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला.

आणि म्हणून मी तुमच्यावर सदरहू आरोप ठेवीत आहे.

(पी. के. मुटकुळे)

दि. ०३/०३/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

कळवण.

**आरोपीचे निवेदन –**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १ | | तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न २ | | तुम्हाला वाचुन व समजावुन सांगितलेला आरोप समजला काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न ३ | | तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ? |
| उत्तर | | होय, मला गुन्हा कबुल आहे. |

————————————

आरोपीची सही/अंगठा

(पी. के. मुटकुळे)

दि. ०३/०३/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

कळवण.

**न्यायनिर्णय**

आरोपीने त्याला गुन्हा मान्य व कबूल असल्याचे कथन केलेले आहे. तसेच, त्या अर्जात त्याने शपथपत्रही दाखल केलेले आहे. आरोपी स्वखुशीने गुन्हा कबुल करत

असल्याची खात्री केली. आरोपीचा गुन्हा हा पहिलाच असल्यामुळे भारतीय दंड विधान कलम २७२ व २७३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, दंड द्रव्याचे शिक्षेवर आरोपीस दोषी ठरविले. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

**१.** आरोपी निलेश दत्तात्रय कोठावदे, रा. गणेशनगर, कळवण, ता.कळवण, जि.नाशिक यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम २७२ व २७३ या गुन्हयासाठी दोषी ठरविले. आरोपीला रुपये २०००/– (रुपये दोन हजार मात्र) चा दंड केला व दंड न भरल्यास चार दिवस साधी कैद भोगावयाची आहे.

**३.** सदर प्रकरणातील जप्त मुद्येमाल अपील कालावधीनंतर मुल्यहीन असल्याने नष्ट करण्यात यावा.

**४.** या न्यायनिर्णयाची एक प्रत आरोपीला ताबडतोब मोफत देण्यात यावी.

सही/–

(पी. के. मुटकुळे)

दि. ०३/०३/२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

कळवण.